SML-103



# महाराष्ट्र विधिमंडळाच्या विषय समित्यांची शोकांतिका

## अहवाल

समर्थन

## समर्थन

**कार्यकारी मंडळ**

श्री. चंद्रशेखर प्रभू (अध्यक्ष)

श्री . टी. के. चौधरी (उपाध्यक्ष)

श्री. विवेक पंडित (कार्याध्यक्ष)

**संपादक** : विवेक पंडित

**संकलन** : अमित जोशी

**मुखपृष्ठ** : जयश्री घोसाळकर

**नोंदणी क्रमांक** :
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई,
१५६७/९६ जीबीबीएसडी

**प्रकाशक (पत्रव्यवहार)** :
डी-२, ग्रीष्मा गार्डनच्या पाठीमागे,
मधुवन हाईटस् जवळ, एव्हर शाईन गेट, गोखिवरे,
वसई (पू) - ४०१२०८, जि. ठाणे
दूरध्वनी : ९५-२५०-३०५९११८/३०५९११९
इमेल : samarthanmumbai97@gmail.com

मुद्रक:
नित्यानंद ग्राफिक्स, वसई (पूर्व)
भ्रमणध्वनी: ०९३२२१०१२८९
इमेल - nityanandgraphix1@gmail.com

## लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभि[illegible] व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

## 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

- ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# महाराष्ट्र विधिमंडळाच्या विषय समित्यांची शोकांतिका

अहवाल

समर्थन प्रकाशन

# समितींच्या अहवालांना शासन दरबारी किंमत काय ?

लोकशाही बळकट ठेवण्यासाठी निवडणुकांची व्यवस्था आहे आणि या निवडणूका नियमितपणे घ्याव्या लागतात हे सर्वांनाच माहिती आहे.

अलिकडेच झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये अल्पमतदान करून देशातल्या मतदारांनी राजकीय पक्षांवरचा असलेला आपला अविश्वास स्पष्टपणे व्यक्त केलेला आहे असे मला वाटते. राजकारणासाठी सिनेकलावंतांच्या लोकप्रियतेचा फायदा घेण्याचा प्रयत्न करणे निदान आपल्या देशात नवीन नाही. आणि या प्रयत्नाला मर्यादित प्रमाणात यश मिळत असल्याचा इतिहास आहे. मात्र देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच सिनेकलावंतांच्या प्रचार मोहिमेसाठी कोट्यवधी रुपये खर्च करून त्यांच्या मुखातून विविध माध्यमांद्वारा नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आल्याचे आपण यावेळी पाहिले. परंतु या कलावंतांना पाहण्यासाठी सिनेमागृहात झुंबड करणारे नागरिक त्यांच्या विनंतीला मान देऊन मतदान करण्यास तयार नाहीत ही वस्तुस्थिती समोर आलेली आहे.

राजकीय नेत्यांचा ढोल दोन्ही बाजूंनी वाजत असतो. अधिक मतदान झाले तर आम्ही केलेल्या कामाची ही पोचपावती आहे असे प्रस्थापित म्हणतील तर प्रस्थापितांविरुद्धचा हा कौल आहे असे विरोधक म्हणतील. मतदान कमी झाले तर जे झाले ते मतदान केवळ आमच्या कार्यकर्त्यांमुळे झाले त्यामुळे आम्ही निश्चिंत आहोत असे काही म्हणतील तर मतदान कमी झाले तरी आमच्या कार्यकर्त्यांमध्ये काही फरक पडणार नाही आणि आम्हीच निवडून येऊ असे दुसरे म्हणतील. एकंदरीत मतदान कसेही झाले तरी तो मुद्दा घेऊन आपली सरशी कशी होणार हे सांगायचा प्रयत्न सगळेच करतात.

यावेळी मतदान कमी झाले व त्याचा परिणाम निकालावर झाला आहे हे लक्षात आल्यावरही काही राजकीय पुढाऱ्यांनी मतदारांवर खापर फोडून आपल्या बेमुर्वतखोरपणाचे जाहीर प्रदर्शन केले. मतदान सक्तीचे व्हायला हवे असे अनेक पुढाऱ्यांनी आवर्जून सांगितले. काहींनी मतदान न करणाऱ्यांवर सक्त कारवाईची मागणी केली तर काहींनी मतदान न करणाऱ्यांनी दंड भरावा अशीही सूचना केली. निवडून आलेले नेते असोत किंवा यश न मिळालेले असोत, कमी मतदान झाल्याच्या कारणावरून मतदारांच्या बाबतीत (मनातल्या मनात) असलेली चीड व्यक्त करण्याची संधी कोणीही सोडली नाही. पण मतदारांनी मतदान का केले नाही हे शोधण्याचा प्रयत्न कोणीही केलेला दिसत नाही किंवा आत्मपरीक्षणाची गरज कोणाला जाणवलेली दिसत नाही.

निवडणुकीतल्या घोषणांतूनच नेत्यांच्या मनात मतदारांबाबत असलेला सुप्त राग हा कोणाच्याही लक्षात येईल इतक्या प्रकर्षाने दिसून आला. *'येऊन येऊन येणार कोण, आमच्याशिवाय आहेच कोण'* या घोषणेचा अर्थच मुळी *'मी आलो तरी तुझी लूट थांबणार नाही आणि तो आला तरी तू काही सुटणार नाहीस'* असा आहे आणि तोच अर्थ मतदारांनी लावला तर त्यांना दोष कसा देता येईल ? कोणीही आले तर माझ्या आयुष्यात काय बदल होणार ? या प्रश्नाचे उत्तर प्रत्येक मतदाराला जेव्हा नकारार्थी मिळते तेव्हा मतदाराच्या दृष्टीने मतदान निरर्थक ठरते हे उघड आहे.

काही राजकीय निरीक्षकांनी म्हणे कारणे शोधण्याचा प्रयत्न केला व मतदारांना मतदान करण्याची संधी त्यांची नावे नसल्यामुळे मिळाली नाही असा जावईशोध लावला. काही ठिकाणी नावे नसतीलही

किंवा काही ठिकाणी जाणीवपूर्वक नावे वगळावीत म्हणून प्रयत्न झाले असतील म्हणूनच राज्यात आणि देशात मतदानाचे प्रमाण कमी झाले असे म्हणणे हास्यास्पद ठरेल. मतदानापूर्वी आरोप-प्रत्यारोप करण्यामध्ये राजकीय नेत्यांनी गाठलेली हीन पातळी व सामान्य माणसाला भेडसावणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने अपेक्षित असणाऱ्या चर्चेचा अभाव या गोष्टींची मतदाराने गांभीर्यपूर्वक नोंद घेतली आणि *'जर माझ्या आयुष्यात कोणताही फरक पडणार नसेल तर मग मी कशाला मतदान करावे'* असे म्हणत मतदार घरीच राहिला.

राज्यकर्त्यांच्या बेमुर्वतखोरपणाचे आणखी एक ज्वलंत उदाहरण द्यायचे म्हटले तर आपणच नेमलेल्या समित्यांच्या अहवालांना ते किती किंमत देतात हे बघायला हवे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या समितींचे अहवाल शासन अनुल्लेखाने मारत असेल किंवा त्यावर कोणताही निर्णय घेत नसेल तर सामान्य माणसाचे प्रश्न सुटतील असे मतदारांना मानायला जागा आहे? विधिमंडळाच्या समित्या कायद्याने कराव्याच लागतात आणि त्यांचे अहवाल देखील सरकारदरबारी दाखल करावेच लागतात. पण या समित्यांच्या कामकाजाला किंवा अहवालांना शासन काही किंमत देत नाही हे वेळोवेळी सिध्द झाले आहे. याबाबत आमच्याकडे आमचा स्वत:चा अनुभव देखील आहे. कायद्याने समिती निर्माण करण्याची आवश्यकता नसतानाही शासनाने गृहनिर्माण विषयक समितीची नेमणूक केली आणि आम्हाला त्याचे अध्यक्ष नेमले. मुंबईत आणि महाराष्ट्रातल्या प्रत्येक नागरिकाला परवडेल अशा किंमतीत घर मिळण्यासाठी काय करावे याबाबत आमच्या समितीने १ ३ खंडात अहवाल सादर करून देखील त्या अहवालावर कोणतीच कारवाई झाली नाही.

यंत्रणेवर अंकुश ठेवण्यासाठी केलेल्या समित्यांच्या अहवालांची अवहेलना व सर्वांना घर हे स्वप्न साकारण्यासाठी नेमलेल्या समितीची प्रतारणा पाहत असलेला मतदार मतदानासाठी का बरे उतरेल? रोज ६० अपघात होत असणाऱ्या लोकल ट्रेनमध्ये प्रवास करणाऱ्यांच्या आयुष्यात कोणताच बदल होणार नाही अशी त्यांना खात्री वाटते. नोकरी करण्यासाठी भटकणाऱ्यांच्या आयुष्यात कोणताच बदल होणार नाही याची त्याला जाणीव आहे. कॉलेजमध्ये ॲडमिशन न मिळालेल्या युवकाला मतदान केल्याने कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळणार नाही याची कल्पना आहे. आणि कुपोषणाने आपली मुले दगावताहेत हे माहीत असलेल्या मातेला मतदान केल्याने आपली मुलं वाचतील [illegible] खात्री नाही. म्हणजेच मतदान न करणे म्हणजेच या राजकीय व्यवस्थेला न जुमानणे असे समीकरण साऱ्यांच्याच मनामध्ये आहे.

समित्यांचे अहवाल मान्य न करणे त्यांनाच खोटे ठरविणे किंवा त्यांनी केलेल्या शिफारशींवर कोणताच निर्णय न घेणे ही बाब गंभीर आहे. यासंदर्भात लोकजागृती झाली तर त्याचादेखील मतदानावर गंभीर परिणाम होणे शक्य आहे. विविध कारणांमुळे मतदार आधीच मतदानाविषयी उदासिन आहेत त्यात या गोष्टीची भर पडली तर ही उदासिनता आणखीच वाढेल. तरीदेखील सत्य उजेडात आणलेच पाहिजे या विचाराने हा अहवाल प्रकाशित करीत आहोत. *'राजकीय नेत्यांनी वेळीच बदलावे अन्यथा घडणाऱ्या परिणामांना तेच जबाबदार ठरतील व ते परिणाम लोकशाहीसाठी हानीकारक असतील'* एवढाच इशारा इथे पुरेसा आहे.

**- चंद्रशेखर प्रभू, अध्यक्ष, समर्थन**

# उत्तरदायित्वाच्या यंत्रणेला धोका : विधिमंडळाने आग्रही भूमिका घेण्याची गरज

भारताने संसदीय लोकशाहीचा स्वीकार केलेला आहे. केंद्र स्तरावर संसदेवर तर राज्य स्तरावर विधिमंडळांवर कायदे बनविण्याबरोबरच कायद्यांची, धोरणांची, योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या कार्यकारी यंत्रणेवर अंकुश ठेवण्याचीही महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. ही जबाबदारी प्रभावीपणे पार पाडण्यासाठी संसदीय समित्यांची निर्मिती करण्यात आली आहे. कायदे, धोरणे, प्रशासन यांचेशी संबंधित अनेक बाबींवर विचार करून शासनांना महत्त्वाच्या व उपयुक्त अशा शिफारशी करण्याचे काम या समित्यांनी वेळोवेळी केले आहे.

महाराष्ट्रातील विधिमंडळाच्या विषय समित्यांनी केलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणीकरीता व उत्तरदायित्वाची ही यंत्रणा अधिक प्रभावी ठरण्याकरीता समर्थन गेल्या काही वर्षांपासून प्रयत्नशील आहे. समित्यांच्या शिफारशींवर शासनाने केलेली कार्यवाही जाणून घेण्यासाठी समर्थनने माहितीच्या अधिकाराचा वापर तर केलाच शिवाय विधिमंडळ सदस्यांनी अतारांकित प्रश्नांच्या माध्यमातून शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती जाणून घेण्यासाठी आग्रही राहावे यासाठीही समर्थनने प्रयत्न केले. ज्या शिफारशींवर वर्षानुवर्षे कार्यवाही झाली नव्हती अशा अनेक शिफारशींवर केवळ कार्यवाहीची माहिती मागितल्याने कार्यवाही केली गेली. उत्तरदायित्त्वासाठी आग्रही राहणे हाच कार्यपालिकेवर अंकुश ठेवण्याचा मार्ग आहे हेच यातून स्पष्ट होते.

समर्थनने शिफारशीवरील कार्यवाहीची माहिती विधिमंडळ सदस्यांना पुरवून वेळोवेळी सभागृहात या संदर्भात चर्चा व्हावी यासाठी प्रयत्न केले. समित्यांच्या शिफारशींवर शासनाकडून कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर विधिमंडळाचे ज्येष्ठ सदस्य श्री. दत्ताजी नलावडे, श्री. गणपतराव देशमुख, श्री. एकनाथ खडसे, श्री. देवेंद्र फडणवीस, श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री. नाना पटोले यांचेसह अनेक सदस्यांनी या संदर्भातील आपली नाराजी तीव्र शब्दात सभागृहात व्यक्त केली आहे. मान. विधानसभा अध्यक्षांनीही या संदर्भात चिंता व्यक्त करून शासनाला कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले होते. परंतु केवळ आश्वासनांपलीकडे शासनाकडून कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत.

संसदेसह देशभरातील इतर राज्यातील समित्या प्रभावीपणे कार्यरत असताना राज्यातील संसदीय समित्यांची अवस्था इतकी बिकट असावी हे महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याला भूषणावह नाही. प्रशासकीय अधिकाऱ्यांचा मुजोरपणा आणि शासनकर्त्यांचे दुर्लक्ष यामुळे उत्तरदायित्वाच्या या यंत्रणेला धोका निर्माण झाला आहे. विधिमंडळ सदस्यांनी कार्यकारी यंत्रणेच्या उत्तरदायित्वासाठी आग्रही राहण्याशिवाय पर्याय नाही. समर्थनने तयार केलेल्या या अहवालाचा उद्देश समिती पद्धतीवर कुठल्याही प्रकारची टीका करण्याचा नाही. संविधानाने निर्माण केलेली ही उत्तरदायित्वाची यंत्रणा अधिक प्रभावीपणे राबवली जावी, कार्यकारी यंत्रणेवर अंकुश राहावा, समित्यांच्या माध्यमातून विधिमंडळ अधिक प्रभावी व्हावे अशी समर्थनची अपेक्षा आहे.

शिफारशींसंदर्भात विचारलेल्या प्रश्नांना शासनाने दिलेली बेजबाबदार उत्तरे, विधिमंडळ समित्यांनी आपल्या अहवालात शासनाप्रती व्यक्त केलेली नाराजी पाहता समित्यांचे कामकाज अधिक अर्थपूर्ण ठरण्यासाठी विधिमंडळाने आग्रही भूमिका घेण्याची गरज आहे असे अवश्य वाटते. समर्थनच्या या अहवालाकडे सर्व पीठासिन अधिकारी तसेच विधिमंडळ सदस्य गांभिर्याने लक्ष देतील ही अपेक्षा.

- **विवेक पंडित**, कार्याध्यक्ष

## अनुक्रमणिका


१. शिफारशी दूरच शासनास समित्यांचे अहवालच मान्य नाहीत ...१

२. शासनाने समितीलाच खोटे ठरविले ...२

३. शिफारशींवर निर्णय घेण्यास शासनाला सवड नाही ...३

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या वसतिगृहासंदर्भातील शिफारशी ५ वर्षे प्रलंबित

अंदाज समितीच्या खाजगी रुग्णालयांसंबंधी शिफारशींवर ३ वर्षात कार्यवाही नाही

महिलांचे हक्क कल्याण समितीच्या राज्य महिला आयोग कार्यक्षम होण्यासंदर्भातील शिफारशींवर ६ महिने निर्णय नाही

शहरी भागातील कुपोषणावर उपाययोजना सुचविणाऱ्या अंदाज समितीच्या अहवालाकडे ७ महिने दुर्लक्ष

४. विधिमंडळाच्या समित्यांनी शासनाप्रति व्यक्त केलेली नाराजी ...७

५. पंचायती राज समितीने केलेल्या शिफारशींवर कार्यवाही करून घेण्यात समर्थनच्या प्रयत्नांना यश ...९

६. समित्यांसंदर्भात झालेल्या चर्चेदरम्यान मा. मंत्रिमहोदयांनी वेळोवेळी दिलेली पोकळ आश्वासने ...१०

# शिफारशी दूरच शासनास समित्यांचे अहवालच मान्य नाहीत

## पंचायती राज समितीची निरीक्षणेच शासनाने फेटाळली

- महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या सन १९९८-९९च्या लेख्यावरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील बीड, नंदूरबार, हिंगोली, गडचिरोली व नाशिक या जिल्हा परिषदांच्या संदर्भातील आपला अहवाल पंचायती राज समितीने दिनांक २५ जुलै २००७ रोजी विधिमंडळास सादर केला.
- पंचायती राज समितीने दिनांक ५,६ व ७ फेब्रुवारी २००४ रोजी हिंगोली जिल्हा परिषदेस भेटी देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रणजित सिंह देओल व मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. एम. ए. हुसेन यांची साक्ष घेतली.
- मागासवर्गीयांना घरासाठी द्यावयाच्या टीनपत्रे खरेदीच्या वेळी जकात अभिकर्त्याकडे ट्रान्झीस्ट फॉर्म न भरल्यामुळे हिंगोली जिल्हा परिषदेला जकातीपोटी रुपये ३८ हजार ९४२ इतका भुर्दंड बसला होता. यास जबाबदार असणाऱ्या समाजकल्याण अधिकाऱ्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिनांक १ जून २००५ रोजी नोटीस बजावल्याची माहिती समितीला साक्षीच्या वेळी देण्यात आली होती.
- जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे पंचायती राज समितीने दिनांक ८ जून २००५ रोजी सचिव, सामाजिक न्याय विभाग यांची साक्ष घेतली.
- हिंगोली जिल्हा परिषदेस बसलेल्या रुपये ३८ हजार ९४१ एवढ्या रकमेच्या भुर्दंडाची रक्कम संबंधिताकडून वसूल करून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी बजावलेल्या नोटीसेनुसार समाजकल्याण अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई करावी अशी शिफारस समितीने शासनाकडे केली.
- समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली याची विचारणा सन्मा. विधिमंडळ सदस्य सर्वश्री. राजेंद्र पाटणी, गुलाबराव पाटील, आशिष जयस्वाल यांनी अतारांकित प्रश्न क्रमांक ९६५६१ च्या माध्यमातून दिनांक ३० जुलै २००८ रोजी शासनाकडे केली.
- ''अशा स्वरुपाचा कुठलाही प्रकार घडला नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही'', असे उत्तर समाजकल्याण मंत्री श्री. चंद्रकांत हंडोरे यांनी दिनांक ४ नोव्हेंबर २००८ रोजी दिले.
- समितीच्या शिफारशी शासन अमान्य असू शकतात मात्र येथे समितीने अधिकाऱ्यांच्या साक्षी व कागदपत्रांची तपासणी करून नोंदविलेल्या बाबीच शासनाने नाकारलेल्या आहेत. शासन विधिमंडळाच्या समित्यांना किती महत्त्व देते हे या एका उदाहरणावरून स्पष्ट होते.

*संदर्भ: पंचायती राज समिती (२००७-०८), अकरावा अहवाल*

# शासनाने समितीलाच खोटे ठरविले

## पंचायती राज समितीचा अहवाल शासनाने खोटा ठरविला

- सातारा व औरंगाबाद जिल्हा परिषदांच्या सन २०००-०१ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील आपला अहवाल पंचायती राज समितीने दिनांक २२ एप्रिल २००८ रोजी विधिमंडळास सादर केला.
- पंचायती राज समितीने दिनांक १९ ते २१ जून २००६ रोजी सातारा जिल्हा परिषदेस भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संभाजी कडू व मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. अजित मोरे यांची साक्ष घेतली होती.
- अंगणवाड्यांना पुरविण्यात येणाऱ्या अन्नधान्यासाठी बचत गटांना सहा-सहा महिने निधी उपलब्ध होत नसल्यामुळे महिला बचत गटांनी खिचडी पुरविण्याचे काम सोडून दिले असल्याचे यावेळी समितीच्या निदर्शनास आले.
- बचत गटांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत वित्त विभागाकडून नवीन पद्धत सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार प्रत्यक्ष निधी उपलब्ध होण्यापूर्वी तीन ते चार स्तरावर कार्यवाही होत असल्यामुळे निधी मिळण्यास उशीर लागत असल्याची माहिती साक्षीच्या वेळी सचिवांनी समितीस दिली.
- बचत गटांना काही वेळा सहा-सहा महिने निधी मिळत नसल्यामुळे त्यांना धान्य खरेदी करणे शक्य होत नाही. त्यामुळे शासकीय अधिकारी ठेकेदारांना धान्य पुरवठा करण्याचे आदेश देतात परिणामी पुन्हा ठेकेदारी पद्धतच अंमलात येत असल्याचेही पंचायती राज समितीच्या निदर्शनास आले.
- अंगणवाड्यांना पुरविण्यात येणाऱ्या अन्नधान्यासाठी बचत गटांना निधी पुरविण्यासंबंधी अस्तित्वात असलेली दीर्घ कार्यवाही कमी करून जास्तीत जास्त दोन महिन्यात निधी प्राप्त होईल अशा प्रकारे कार्यवाही करण्यात यावी अशी शिफारस समितीने शासनाकडे केली.
- समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली याची विचारणा सन्मा. विधिमंडळ सदस्य मान. सर्वश्री. राजेंद्र पाटणी, गुलाबराव पाटील, आशिष जयस्वाल यांनी अतारांकित प्रश्न क्रमांक ९६५३४ च्या माध्यमातून दिनांक २ ऑगस्ट २००८ रोजी शासनाकडे केली.
- हे खरे नसल्यामुळे कोणतीही कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे उत्तर महिला व बाल विकास मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी दिनांक २५ नोव्हेंबर २००८ रोजी दिले.
- शासनास समितीची शिफारस मान्य असावी किंवा नाही हा स्वतंत्र मुद्दा आहे परंतु येथे शासनाने समितीचा अहवालच खोटा ठरविला आहे.

*संदर्भ: पंचायती राज समिती (२००७-०८), अकरावा अहवाल*

## शिफारशींवर निर्णय घेण्यास शासनाला सवड नाही

**विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या वसतिगृहासंदर्भातील शिफारशी ५ वर्षे प्रलंबित**

- ❑ राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अर्थसंकल्पात करावयाच्या तरतुदीं संदर्भातील आपला पाचवा अहवाल विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने दिनांक २५ जुलै २००३ रोजी विधिमंडळास सादर केला.
- ❑ राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी ग्रामीण भागातून शहरी भागात, तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागते. अशा ठिकाणी मोफत शिक्षणाची सोय नसल्यामुळे उच्च शिक्षणापासून त्यांना वंचित राहावे लागत असल्याचे यावेळी समितीच्या निदर्शनास आले.
- ❑ राज्यात समाजकल्याण विभागांतर्गत मुला-मुलींची २४६ शासकीय वसतिगृहे असून त्यामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी जे आरक्षण आहे ते अत्यंत अपुरे असल्याचेही यावेळी समितीच्या निदर्शनास आले.
- ❑ उच्च शिक्षणासाठी ग्रामीण भागातून शहरी भागात, तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी येणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी निवासाची सोय व्हावी म्हणून स्वतंत्र वसतिगृहे उघडण्यासाठी मान्यता देण्यात यावी व या वसतिगृहातून विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांची सोय करावी अशी शिफारस विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने शासनाकडे केली.
- ❑ समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली याची विचारणा सन्मा. विधिमंडळ सदस्य सर्वश्री. जैनुद्दिन जव्हेरी, संजय दत्त, प्रतापसिंह मोहिते-पाटील, गोविंदराव आदिक, सुरेशदादा देशमुख यांनी अतारांकित प्रश्न क्रमांक ३८६९७ च्या माध्यमातून दिनांक १० एप्रिल २००८ रोजी केली.
- ❑ विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करण्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे, उत्तर तत्कालिन मुख्यमंत्र्यांनी दिनांक २८ ऑगस्ट २००८ रोजी दिले.
- ❑ समितीने सन २००३ मध्ये केलेल्या महत्त्वाच्या शिफारशीवर सन २००८ पर्यंत म्हणजे तब्बल ५ वर्षाचा कालावधी उलटला असतानाही शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

*संदर्भ: विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती (२००२-०३), पाचवा अहवाल*

## अंदाज समितीच्या खाजगी रुग्णालयांसंबंधी शिफारशींवर ३ वर्षांत कार्यवाही नाही

- सार्वजनिक न्यास कायद्याखाली नोंदणी झालेल्या रुग्णालयांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी काही खाटा राखून ठेवण्याच्या योजनाबाबतचा आपला अहवाल अंदाज समितीने दिनांक २३ मार्च २००६ रोजी विधिमंडळास सादर केला.
- बॉम्बे पब्लिक ट्रस्ट अ‍ॅक्ट, १९५० मधील तरतुदीप्रमाणे आणि महसूल व वन विभागाच्या दिनांक २२ जून १९९० च्या परिपत्रकानुसार निश्चित केलेल्या अटी व शर्तींचे पालन करणे हे राज्यात धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी झालेल्या खाजगी रुग्णालयांवर बंधनकारक असतानाही राज्यातील खाजगी रुग्णालये या अटी व शर्ती पाळत नसल्याची कबुली साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी समितीला दिली होती.
- धर्मार्थ रुग्णालयांनी घातलेल्या अटींचे पालन केले नाही तर सध्याच्या तरतुदीप्रमाणे रुपये दोन हजार एवढ्या दंडाची शिक्षा असल्याची महिती समितीला यावेळी देण्यात आली.
- सध्याच्या काळात रुपये दोन हजार एवढ्या दंडाची शिक्षा ही अत्यल्प स्वरुपाची असून ती रक्कम १ लाखापर्यंत वाढविण्याबाबत तसेच एक वर्षाच्या कारावासाची शिक्षा किंवा दोन्ही देण्याबाबत राज्य शासनामार्फत प्रस्ताव तयार करण्यात आला असल्याची माहिती समितीस देण्यात आली.
- राज्य शासनामार्फत तयार करण्यात आलेल्या प्रस्तावावर त्वरित निर्णय घेऊन त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात यावी अशी शिफारस समितीने शासनाकडे केली.
- समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली याची विचारणा सन्मा. विधिमंडळ सदस्य सर्वश्री. संजय दत्त, प्रतापसिंह मोहिते-पाटील, गोविंदराव आदिक यांनी अतारांकित प्रश्न क्रमांक ४१९६९ च्या माध्यमातून दिनांक १६ मे २००८ रोजी शासनाकडे केली.
- समितीच्या शिफारशीवर कार्यवाही केलेली नाही. दंडाची रक्कम रुपये दहा हजार प[illegible] वाढविण्याच्या विधि आयोगाच्या शिफारशीवर कार्यवाही करण्यात येत आहे, असे उत्तर तत्कालिन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी दिनांक १९ जुलै २००८ रोजी दिले. समितीची शिफारस शासनास का मान्य नाही याचे कारण शासनाने दिलेले नाही.
- विधि आयोगाच्या शिफारशीचे कारण पुढे करत शासनाने समितीने मार्च २००६ मध्ये केलेल्या शिफारशीवर २ वर्षांहून अधिक काळ उलटल्यानंतरही कार्यवाही करण्याचे टाळले आहे.

*संदर्भ: अंदाज समिती (२००५-०६), चौथा अहवाल*

**महिलांचे हक्क कल्याण समितीच्या राज्य महिला आयोग कार्यक्षम होण्यासंदर्भातील शिफारशींवर ६ महिने निर्णय नाही**

- महाराष्ट्र राज्य महिला आयोगासंदर्भातील आपला अहवाल महिलांचे हक्क कल्याण समितीने दिनांक २३ एप्रिल २००८ रोजी विधिमंडळास सादर केला.
- महिलांचे हक्क कल्याण समितीच्या बैठकांमध्ये महिला हक्कांसंदर्भात अतिशय महत्त्वपूर्ण काम करणाऱ्या राज्य महिला आयोगाचे कामकाज, परिणामकारक कामकाज करताना आयोगास येणाऱ्या अडचणी तसेच आयोगासाठी दरवर्षी अंदाजपत्रकात करण्यात येणारी कमी तरतूद या संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.
- दिनांक २१ जून २००६ रोजी झालेल्या समितीच्या बैठकीत राज्य महिला आयोगाबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी महिला व बाल विकास विभागास प्रश्नावली तयार करून पाठविण्यात आली.
- दिनांक ६ फेब्रुवारी २००८ रोजी झालेल्या समितीच्या बैठकीत विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने मान. अध्यक्षा व सचिव, राज्य महिला आयोग तसेच मान. सचिव, महिला व बाल विकास विभाग यांची साक्ष घेतली.
- समितीकडे प्राप्त झालेल्या एकूण माहितीच्या आधारे समितीने शासनाकडे पुढील महत्त्वाच्या शिफारशी केल्या. (१) सन २००७ पासून राज्य महिला आयोगावर रिक्त असलेली ३ सदस्यांची पदे तातडीने भरण्यात यावीत. (२) महिला आयोगाकडे प्रलंबित असलेल्या तक्रारींचा त्वरित निपटारा होण्यासाठी आयोगास लोकन्यायालयाच्या धर्तीवर छोटे न्यायालय सुरू करण्याचा अधिकार देण्यात यावा. (३) राज्य महिला आयोगाच्या आस्थापनेवर विधिविषयक, तसेच एम.बी.ए/ एम.एस.डब्ल्यू या पदव्या धारण केलेल्या उमेदवारांचा समावेश करण्यात यावा. (४) राज्यातील ग्रामीण भागातील महिलांच्या सोयीच्या दृष्टीने राज्य महिला आयोगाचे एक कार्यालय राज्यातील विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी उभारून त्यामध्ये किमान एक व्यवस्थापक, दोन समुपदेशक व दोन संघटक असा कर्मचारी वर्ग नेमण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.
- समितीने केलेल्या वरील शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने कार्यवाही केली अथवा नाही याची विचारणा सन्मा. विधिमंडळ सदस्य सर्वश्री. राजेंद्र पाटील, गुलाबराव पाटील व आशिष जयस्वाल यांनी अतारांकित प्रश्न क्रमांक ९६५३२, ९६५५३ व ९६५५५च्या माध्यमातून दिनांक २१ ऑगस्ट २००८ रोजी शासनाकडे केली.
- महिला व बाल विकास मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी दिनांक २१ ऑक्टोबर २००८ व २५ नोव्हेंबर २००८ रोजी या प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली. यापैकी कोणत्याही शिफारशींसंदर्भात शासनाने ६ महिने उलटून गेले तरी निर्णय घेतलेला नव्हता.

*संदर्भ: महिलांचे हक्क कल्याण समिती (२००७-०८), चौदावा अहवाल*

शहरी भागातील कुपोषणावर उपाययोजना सुचविणाऱ्या अंदाज समितीच्या अहवालाकडे ७ महिने दुर्लक्ष

- एस.टी. व शहर बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून मिळणाऱ्या अधिभाराची रक्कम आदिवासी विभागातील कुपोषित बालके व माता यांच्या संगोपनाकरीता खर्च करणेबाबतचा आपला अहवाल अंदाज समितीने दिनांक २५ एप्रिल २००८ रोजी विधिमंडळास सादर केला.
- अंदाज समितीने दिनांक २३ जानेवारी २००८ रोजी महिला व बाल विकास विभाग, वित्त विभाग व नगर विकास विभागांच्या प्रधान सचिवांची एकत्रित साक्ष घेतली.
- शहरी भागात अंगणवाड्यांची फार वाईट परिस्थिती असल्याची माहिती साक्षीच्या वेळी अंदाज समितीच्या सदस्यांनी सचिवांच्या निदर्शनास आणून दिली.
- शहरी भागात विशेष करून झोपडपट्ट्यांमध्ये अंगणवाड्या चालविण्यासाठी जागा नाही, जागा असल्यास त्या ठिकाणी इमारत नाही अशा तक्रारी समिती सदस्यांनी सचिवांसमोर मांडल्या.
- ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागातही कुपोषित मुलांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याचेही समिती सदस्यांनी सचिवांच्या निदर्शनास आणून दिले.
- शहरी भागातील कुपोषित बालकांच्या स्थितीत व आरोग्यात्मक सुधारणा होण्यासाठी अंगणवाड्यांचे काम नगरपालिका किंवा महानगरपालिकेकडे सोपविण्यात यावे अशी शिफारस समितीने शासनाकडे केली.
- समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली याची विचारणा सन्मा. विधिमंडळ सदस्य सर्वश्री. राजेंद्र पाटणी, गुलाबराव पाटील व आशिष जयस्वाल यांनी अतारांकित प्रश्न क्रमांक ९६५४१च्या माध्यमातून दिनांक २१ ऑगस्ट २००८ रोजी शासनाकडे केली.
- याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे, उत्तर महिला व बाल विकास मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी दिनांक २० नोव्हेंबर २००८ रोजी दिले.

*संदर्भ: अंदाज समिती (२००७-०८), अठरावा अहवाल*

*समित्यांच्या अहवालांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती विचारली असता - 'प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे', 'अद्याप निर्णय घेतलेला नाही', 'कार्यवाही करण्यात येत आहे', अशा शासनाने दिलेल्या उत्तरांचा अर्थ म्हणजे शासनाने शिफारशींवर कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नाही. शासन एकूणच विधिमंडळाच्या समित्यांना किती महत्त्व देते हे वरील उदाहरणांवरून स्पष्ट होते.*

# विधिमंडळाच्या समित्यांनी शासनाप्रति व्यक्त केलेली नाराजी

२७ मार्च १९९५ रोजी लोकलेखा समितीने आपला सत्ताविसावा अहवाल विधानमंडळास सादर केला त्या अहवालामध्ये समितीने शिफारस केली होती की, अतिक्रमणाच्या संदर्भात जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कठोर कार्यवाही करावी असे असतानाही तब्बल १२ वर्षे उलटूनही विभागाने त्या अनुषंगाने अद्यापही कार्यवाही न करणे ही अतिशय गंभीर बाब असून, समितीचा अवमान करणारी आहे.

*लोकलेखा समिती (२००७-०८), सहावा अहवाल*

समितीच्या अहवालातील केलेल्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाही संबंधातील माहिती विभागाकडून या सचिवालयास ३ महिन्याच्या आत पाठवणे आवश्यक होते असे असतानाही दि. १६ ...स्ट २००३, दि.१८ जुलै २००६, दि. ९ नोव्हेंबर २००६ व दि. ४ जून २००७ रोजी स्मरणपत्रे पाठवूनही समितीच्या शिफारशींवर कोणती कार्यवाही केली वा केली नाही याबाबत विभागाने अद्यापही कळविलेले नाही. विधानसभेच्या लोकलेखा समितीसारख्या महत्त्वाच्या समितीच्या शिफारशींकडे शासन दुर्लक्ष करते ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. समिती याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

*लोकलेखा समिती (२००७-०८), सातवा अहवाल*

श्री बालाजी सहकारी पार्टीकल बोर्ड या कारखान्यास आकस्मिकता निधीतून ३ कोटी ८५ लाख रुपये देण्यात आले.या संबंधीची संपूर्ण माहिती १५ दिवसात समितीला सादर करावी असे समितीने प्रधान सचिव, सहकार विभाग यांना दिनांक १२ सप्टेंबर २००७ रोजीच्या बैठकीत सांगितले असतानाही सहकार विभागाने या संबंधीची माहिती अद्यापही समितीस सादर केली नाही ही बाब अत्यंत गंभीर असून लोकलेखा समितीसारख्या अत्यंत महत्त्वाच्या अशा समितीच्या कामकाजाकडे दुर्लक्ष करण्याचीच विभागाची प्रवृत्ती दिसून येते असे समितीला खेदाने म्हणावे लागत आहे.

*लोकलेखा समिती (२००७-२००८), नववा अहवाल*

लोकलेखा समितीच्या साक्षीसाठी सामाजिक न्याय विभागाने पाठवलेली माहिती विसंगत असून सदर ...ती दुरुस्त करून ती समितीस सादर करावयास पाहिजे होती. ज्या अधिकाऱ्यांनी विसंगत माहितीची ज्ञापने विधानमंडळ सचिवालयास पाठविलेली आहेत, त्याबाबत चौकशी करून योग्य ती कारवाई करून एक महिन्यात समितीला कळविण्यात येईल असे प्रधान सचिवांनी दि. ११ ऑक्टोबर २००७ रोजीच्या बैठकीत आश्वासन देऊनही त्याबाबतची माहिती अद्यापही समितीला कळविण्यात आलेली नाही. ही बाब गंभीर स्वरुपाची असून याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

*लोकलेखा समिती (२००७-०८), नववा अहवाल*

समितीला साक्षीच्या वेळी पुरेशी माहिती न मिळाल्यामुळे साक्ष पूर्ण करता आली नाही. अर्धवट माहितीमुळे दिनांक १२ सप्टेंबर २००७ रोजीची साक्ष समितीला थांबवावी लागली. ही बाब गंभीर स्वरुपाची असून असे प्रकार वारंवार घडत असल्यामुळे समितीला आपले काम नियोजित कार्यक्रमानुसार पार पाडण्यास अडथळे निर्माण होत आहेत.

*लोकलेखा समिती (२००७-०८), नववा अहवाल*

शासकीय यंत्रणा आपली कर्तव्ये पार पाडीत नाहीत. शासनाने नेमून दिलेली कामे, दिलेल्या सूचना व त्याची अंमलबजावणी करत नाही याची लोकलेखा समितीने दखल घेऊन त्या अनुषंगाने समितीने आपल्या अहवालात शिफारस केली होती. तथापि उक्त शिफारशींची नगर विकास विभाग, महसूल विभाग व गृहनिर्माण विभागाने कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही. ही बाब गंभीर स्वरुपाची असून विधानमंडळाच्या लोकलेखा समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी न करणे, शिफारशींच्या अनुषंगाने कार्यवाही न करणे, शिफारशींच्या विरुद्ध कारवाई करणे असे प्रकार वारंवार घडत आहेत. हे समितीच्या प्रकर्षाने निदर्शनास आले असल्याने समिती याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

*लोकलेखा समिती (२००७-०८), सहावा अहवाल*

समितीने वारंवार स्मरणपत्रे पाठवून देखील आदिवासी विकास विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, कृषि व पदुम विभाग या विभागांनी सन २०००-०१ व २००१-०२ या वर्षाच्या विनियोजन लेख्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापने अद्यापही समितीला पाठवली नाहीत. लोकले[illegible] समिती ही विधानमंडळाची वैधानिक समिती असून या समितीच्या कामकाजास मंत्रालयीन विभागांनी प्राधान्य देणे गरजेचे आहे. समितीच्या कामाकडे दुर्लक्ष करणे ही बाब समितीचा अधिक्षेप करणारी आहे. समितीने विचारलेल्या प्रश्नांना विभागीय सचिवांनी अभ्यासपूर्ण व परिपूर्ण माहिती देणे अपेक्षित आहे. मात्र बहुतांशी सचिव समितीस माहिती देताना अपूर्ण व असमाधानकारक माहिती देतात. त्यामुळे समितीला योग्य त्या निष्कर्षाप्रती येणे शक्य होत नाही.

*लोकलेखा समिती (२००७-०८), नववा अहवाल*

समितीसमोर साक्षीच्यावेळी विचारलेल्या काही मुद्द्यांबाबतची माहिती विभागीय सचिव नंतर माहिती पाठवतो, १५ दिवसात अथवा १ महिन्यात माहिती देण्यात येईल, अथवा कार्यवाही करून समितीला कळविण्यात येईल, अशाप्रकारची आश्वासने देतात. परंतु दिलेल्या आश्वासनाबाबतची माहिती पाठविण्याची दखल घेतली जात नाही. किंबहुना अशी माहिती समितीचा अहवाल तयार होईपर्यंत अथवा अजिबातच प्राप्त होत नाही.

*लोकलेखा समिती (२००७-०८), नववा अहवाल*

जिल्हा स्तरावरील महिला कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेत निवड समितीमध्ये जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास समितीच्या सभापतीचा अंतर्भाव करावा याबाबत समिती सातत्याने मागणी क[illegible] आहे. तथापी शासनाकडून याबाबत कार्यवाही करण्याबाबत उदासीनता दाखवली जात आहे.

*महिलांचे हक्क व कल्याण समिती (२००७-०८), अनुपालन अहवाल*

वसतिगृहातील आजारी मुलींसाठी वेगळा कक्ष देण्याबाबत राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना मार्गदर्शक सूचना देण्याबाबत समितीच्या अहवालात शिफारस करण्यात आली होती. परंतु अद्यापही तशा सूचना शासनाने निर्गमित केलेल्या नाहीत. समितीच्या या महत्त्वपूर्ण शिफारशीबाबत महिला व बाल विकास विभागाकडून पाठपुरावा झालेला नाही याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.

*महिलांचे हक्क व कल्याण समिती (२००७-०८), अनुपालन अहवाल*

## पंचायती राज समितीने केलेल्या शिफारशींवर कार्यवाही करून घेण्यात समर्थनच्या प्रयत्नांना यश

विधिमंडळाच्या पंचायती राज समिती (२००७-०८) ने दिनांक २५ जुलै २००७ रोजी आपला अकरावा अहवाल विधिमंडळास सादर केला.

समितीने बीड जिल्हा परिषदेला दिनांक १८, १९ व २० ऑगस्ट २००३ रोजी भेटी देऊन प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या साक्षी घेतल्या होत्या. त्यावेळी बीड जिल्हा परिषदेने कर्मचाऱ्यांच्या भविष्यनिर्वाह निधीच्या रकमा विलंबाने भरल्याने शासनाचे रुपये १६ लाख १८ हजार ६० एवढ्या रकमेचे नुकसान झाल्याचे उघडकीस आले होते. जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या भविष्यनिर्वाह निधीच्या रकमा कर्मचाऱ्यांच्या खाती वेळच्या वेळी जमा करण्याबाबत परिपत्रक जारी करण्याची शिफारस समितीने शासनाकडे केली होती.

बीड जिल्हा परिषदेप्रमाणे राज्यातील इतर जिल्हा परिषदांमध्येही भविष्यनिर्वाह निधीच्या रकमा वेळच्यावेळी भरल्या न गेल्याने शासनाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान होत असावे हे गृहित धरून समितीने सदर शिफारस केली होती. समर्थनने पंचायती राज समितीने केलेल्या या महत्त्वाच्या शिफारशीच्या अंमलबजावणीकरिता पाठपुरावा केला. दिनांक २१ जानेवारी २००८ रोजी समर्थनने शासनाच्या ग्रामविकास विभागाकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करून शासनाने केलेल्या कार्यवाहीची विचारणा केली. अर्ज केल्यानंतर ८ दिवसांतच, दिनांक २९ जानेवारी २००८ रोजी ग्रामविकास विभागाने समितीने शिफारस केल्याप्रमाणे परिपत्रक निर्गमित करून राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना पाठवले.

त्याचप्रमाणे दिनांक १५ नोव्हेंबर २००५ रोजी पंचायती राज समितीने प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या घेतलेल्या साक्षीच्या वेळी राज्यात विविध कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना मंजुरी दिल्यानंतर योजनांची कामे विहित कालावधीत पूर्ण न झाल्याने नागरिकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले होते. राज्यातील पाणी पुरवठ्याच्या योजना राबविण्यात येताना ज्या ठेकेदारांना काम देण्यात येते, त्यांनी पूर्वी केलेल्या कामाचा दर्जा, त्यांच्याकडे असलेली यंत्रसामुग्री त्यांच्याकडील गुणवत्ता तपासून घेऊन कामासाठी योग्य व सक्षम कंत्राटदार नेमण्याची शिफारस पंचायती राज समितीने केली होती. सदरहू शिफारशीच्या अंमलबजावणीकरिताही समर्थनने सातत्याने पाठपुरावा केला. दिनांक २१ जानेवारी २००८ रोजी शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करून शासनाने केलेल्या कार्यवाहीची विचारणा केली. समितीने शिफारस केल्याप्रमाणे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे असे विभागाने कळविले. दिनांक २ ऑगस्ट २००८रोजी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने तसे परिपत्रक निर्गमित केले. समितीने अहवाल सादर केल्यानंतर तब्बल वर्षभराने शासनाने सदर कार्यवाही केली.

## समित्यांसंदर्भात झालेल्या चर्चेदरम्यान मा. मंत्रिमहोदयांनी वेळोवेळी दिलेली पोकळ आश्वासने

**शासनाकडून ॲक्शन टेकन रिपोर्ट आल्यानंतर समितीचा एखादा अहवाल चर्चेसाठी घेण्याचा येथून पुढच्या काळात निश्चितपणे प्रयत्न केले जातील.**

- संसदीय कार्य मंत्री मान.श्री. हर्षवर्धन पाटील

जुलै २००६ चे पावसाळी अधिवेशन

**समितीच्या अहवालावर सभागृहात चर्चा व्हावी या संदर्भात मान. विरोधी पक्षनेते व सर्व पक्षाचे गटप्रमुख यांच्या समवेत बैठक घेण्यात येईल व त्या बैठकीत या अहवालावर चर्चा कशाप्रकारे करता येईल या संबंधीचा निर्णय घेऊ, यात चर्चा होईल, अशा प्रकारचा प्रयत्न करू.**


- संसदीय कार्य मंत्री मान. श्री. हर्षवर्धन पाटील

डिसेंबर २००६ चे हिवाळी अधिवेशन

**समित्यांनी केलेल्या शिफारशींवर विभागाने कृती करणे व मान्यता देणे यासाठी जी पद्धत असली पाहिजे ती पद्धत किंवा तशी असली तरी ती तितकीशी परिणामकारक नसून शिफारशींवर विभागाने जाणीवपूर्वक कारवाई करावी याकरिता एक यंत्रणा तयार करण्याचा मी विचार केला आहे.**

- वित्त मंत्री मान.श्री. दिलीप वळसे पाटील

डिसेंबर २००८ चे हिवाळी अधिवेशन




सामाजिक / राजकीय कार्यकर्ते व समाजशास्त्र, राज्यशास्त्र, सामाज कार्य अभ्यासकांसाठी तसेच चोखंदळ वाचकांच्या पसंतीस उतरलेले पुस्तक

## माणूस म्हणून जगण्यासाठी

**लेखक : श्री. विवेक पंडित** **किंमत रुपये २५०/-**

**खास सवलत** **रु. २००/- पाठवा रजि. पोस्टाने घरपोच प्रत मिळवा**

**स्थळ : मयंक कम्युनिकेशन्स**, डी-२, ग्रीष्मा गार्डनच्या पाठीमागे, मधुवन हाईटस्‌जवळ
एव्हर शाईन गेट, गोखिवरे, वसई (पू) - ४०१२०८, जि. ठाणे
भ्रमणध्वनी : ९८९०८१४७७४ (संतोष काकड)

# विधिमंडळ समित्यांच्या नशिबी 'वांझोटे'पणाच..!

- समित्यांवरील १० कोटींचा खर्च पाण्यात
- अहवालांवर ना कारवाई, ना साधी चर्चा



विधिमंडळाची उत्तरदायित्वाची संकल्पना लोकशाहीत अधिक बळकट व्हावी म्हणून विविध संसदीय समित्यांच्या शिफारशींकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. विधिमंडळाच्या शिफारशींवर शासनाने तात्काळ कार्यवाही करणे बंधनकारक केले तर विधिमंडळाच्या प्रशासनावर प्रभावी अंकुश ठेवता येईल. आज असे बंधन नसल्यामुळे प्रशासनाकडून या शिफारशींची फारशी दखल घेतली जात नाही.

# संसदीय समित्यांच्या शिफारशीची उपेक्षा

अमित जोशी

# समितींच्या शिफारसींबाबत शासन उदासीन

देवेंद्र मेढेकर

मुंबई, दि. १४ - प्रशासनातील गुंतागुंतीच्या व तांत्रिक स्वरूपाच्या बाबींचा विचार करून शासनाला योग्य त्या उपाययोजना व शिफारसी करण्याचे कार्य विधिमंडळाच्या विविध समित्या करीत असल्या तरी त्यांनी केलेल्या शिफारसींबाबत शासन उदासीन असल्याचे मत 'समर्थन' या संस्थेने व्यक्त केले आहे.

या संस्थेने राज्य शासनाच्या सामाजिक न्याय, शालेय शिक्षण, सार्वजनिक बांधकाम, कृषी व पशुसंवर्धन, सार्वजनिक आरोग्य विभाग आदी एकूण १८ विभागांकडे केलेल्या शिफारसींच्या अंमलबजावणीबाबत पत्रव्यवहार करून माहिती मागितली होती. ...

नाही. समित्यांच्या कामकाजाकरिता कोट्यवधी रुपयांचा खर्च शासनाकडून होत असतो. सदस्य तासन् तास चर्चा करून महत्त्वपूर्ण व उपयुक्त अशा शिफारसी शासनाला करीत असतात; परंतु शिफारसींवर शासनाकडून कार्यवाही होत नाही. जर कार्यवाही होत नसेल तर कोट्यवधींचा खर्च करायचा कशाला, हा सर्वसामान्यांना प्रश्न पडतो. याला फक्त शासनच जबाबदार आहे, असे नव्हे तर समितीचे सदस्य असलेले आमदार हेसुद्धा समितीच्या बैठकीला उपस्थित राहत नाहीत. याच विषयासंदर्भात मागील दोन्ही अधिवेशनांत सभागृहात चर्चा घडवून आणली होती. या चर्चेत काही सदस्यांनी आपले विचार मांडले होते. त्यावर संसदीय कार्यमंत्र्यांनी दिलेले आश्वासन

पुढच्या काळात निश्चितपणे प्रयत्न केले जातील. 'समितीच्या अहवालावर सभागृहात चर्चा व्हावी याकरिता विरोधी पक्षनेता, सर्व पक्षांचे गटप्रमुख यांच्यासमवेत बैठक घेण्यात येईल व त्या बैठकीत अहवालावर चर्चा कशा प्रकारे करता येईल यासंबंधीचा निर्णय घेऊन यात चर्चा होईल, अशा प्रकारचा प्रयत्न करू,' असे त्यांनी सांगितले होते.

अंदाजपत्रकाच्या दर्जा सुधारण्यासंबंधी, पंचायत राज समिती, अनुसूचित जाती कल्याण, अनुसूचित जमाती, महिलांचे हक्क व कल्याण समिती या सर्व जनतेशी संबंधित असलेल्या महत्त्वाच्या समितींच्या शिफारसी शासनाने उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून यंत्रणा अधिक प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

२ सामना

मुंबई

### विधिमंडळ समितींच्या उपयुक्ततेवर प्रश्नचिन्ह

# विविध समितींचे अहवाल 'कोमा'त !

# विधिमंडळ समित्यांना आमदारच कंटाळले

सुरेंद्र मुळीक

मुंबई, दि. १ - शासनाच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी विधिमंडळाने नियुक्त केलेल्या विविध समित्यांच्या अहवालालाच शासनाने केराची टोपली दाखविली आहे. अनेक अहवालांतील शिफारशी सहा सहा वर्षे पडून आहेत. त्यांची अंमलबजावणी झालीच नाही. शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान तर झालेच, पण शासनाचा कारभार अधिकारीच चालवितात लोकप्रतिनिधी नाही, हेसुद्धा या अधिकाऱ्यांनी दाखवून दिले. यामुळे विधिमंडळ समित्यांना आमदारच कंटाळले आहेत.

कार्यकारी मंडळ व राज्य शासनाच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी विधिमंडळाने अनुसूचित जमाती कल्याण समिती, अनुसूचित जाती कल्याण समिती, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती, महिलांचे हक्क व कल्याण समिती, पंचायत राज समिती, अंदाज समिती, रोजगार हमी योजना समिती अशा विविध समित्यांच्या नियुक्त्या केलेल्या आहेत. या समितीची जबाबदारी सभागृहातील सदस्यांवर सोपविण्यात येते. प्रशासनाच्या गुंतागुंतीच्या व तांत्रिक स्वरूपाच्या बाबींचा विचार करण्याची जबाबदारी या सदस्यांवर असते. या समित्यांनी अहवालात सांगितलेल्या शिफारशींवर तीन महिन्यांच्या कालावधीत शासनाने कार्यवाही करणे अपेक्षित असते, परंतु समितीने अहवाल सादर

(पान ८ वर)



एकनाथ खडसे : समिती सभागृहाला सादर केल्यानंतर कार्यवाही केली हे सभागृहाला अस्तित्वाला महत्त्व राहत नाही. शासन गंभीर दखल घेऊन कारवाई करीत ... देण्यात आलेल्या आहेत त्या बरखास्त करून ... पैसा जातो.

नाना पटोले : विधिमंडळ समित्यांच्या शिफारशींवर कार्यवाही केली गेली नाही तर ... पक्षी, अशी आमचे मत झालेले आहे.



दत्ताजी नलावडे : ... होते. त्यांनी सादर केलेल्या अ... अजूनही विचार केलेला नाही. मंत्रीमहोदयांनीसुद्धा याचा ... केले जाते.



बाबासाहेब कुपेकर : ... चर्चा करावी लागेल. सध्या समितीच्या अहवालावर चर्चा ...